महाराष्ट्र शासन

आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

जुने जकात घर, २रा मजला,शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ०२३

ईमेल - directorevsed@gmail.com


विषय :- विदेशी बनावटीच्या मद्याच्या बाटल्या नाश करणेबाबत.

# परिपत्रक

मुंबई, 22 जानेवारी, 2016

क्र. डिईटी 112016/14/नऊ.

उपरोक्त विषयाबाबतचे या कार्यालयाचे परिपत्रक क्र. डिईटी 112013/2970/69/नऊ, दि. 17/7/2013 अन्वये सर्व अधीक्षकांना निर्देशित करण्यात आले होते की, त्यांनी त्यांच्या जिल्हयातील सर्व परवाना कक्ष अनुज्ञप्ती धारक, क्लब अनुज्ञप्ती धारक, सी.एल.- 3 अनुज्ञप्ती धारक यांना सदर परिपत्रकाच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने त्यांच्या स्तरावर निर्देश देण्याचे कळविण्यात आले होते. परंतु सदर सुचनांचे योग्यरित्या पालन होत नसल्याचे दिसून येते. परदेशी बनावटीच्या विदेशी मद्यावरील उत्पादन शुल्क व विक्री कराचा दर विचारात घेता अशा बाटल्यांचा पुनर्वापर झाल्यास महाराष्ट्र शासनाच्या महसूलाची हानी होऊ नये याद्दष्टीने बनावट मद्य निर्मिती व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींवर कार्यवाही करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. परंतु सदर परिपत्रकीय सुचनांचे पालन होत नसल्याचे दिसून येते. करीता खालील निर्देशांचे काटेकोर पालन करावे:-

1) अलिकडेच काही कार्यकारी व भरारी पथकातील अधिकाऱ्यांनी उघडकीस आणलेल्या गुन्हयांमध्ये परदेशी बनावटीचे उच्च प्रतीचे विदेशी मद्य उदा. स्कॉच, सिंगल माल्ट व्हिस्की, टकीला इ. च्या रिकाम्या बाटल्यांचा बनावट स्कॉच तयार करण्यासाठी पुर्नवापर होत असल्याचे निदर्शनास आले आहे. परवाना कक्ष अनुज्ञप्ती, क्लब अनुज्ञप्ती, पंचतारांकित हॉटेल्स इत्यादि ठिकाणी विक्री पश्चात रिकाम्या झालेल्या बाटल्या बनावट विदेशी मद्य तयार करण्यासाठी पुरविल्या जातात अशी माहिती प्राप्त झाली आहे. परदेशी बनावटीच्या विदेशी मद्यावरील उत्पादन शुल्क व विक्री कराचा दर विचारात घेता अशा बाटल्यांचा पुर्नवापर झाल्यास शासनाच्या महसूलास हानी पोचते. शासनाच्या महसुलाच्या संरक्षणाच्या दृष्टीने तसेच त्यात वाढ होण्याच्या दृष्टीने आणि बनावट मद्य निर्मितीस आळा बसावा यासाठी परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन होणे गरजेचे आहे. सदर प्रकरणी असे नमुद करण्यात येते की, ज्याअर्थी राज्य उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांनी उघडकीस आणलेल्या बऱ्याचशा गुन्हयांमध्ये परदेशी बनावटीचे उच्च प्रतीचे विदेशी मद्य उदा. स्कॉच, सिंगल माल्ट, व्हिस्की, टकीला इ. च्या रिकाम्या बाटल्यांचा बनावट स्कॉच तयार करण्यासाठी पुनर्वापर होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

30/1/16



विभागीय उप-आयुक्त,
राज्य उत्पादन शुल्क,
नाशिक विभाग, नाशिक यांचे कार्यालय
आवक क्रमांक ....113....
दिनांक ....30/1/2016....
विभाग ....

2) अनुज्ञप्ती धारकांना विदेशी मद्याच्या रिकाम्या बाटल्या नाश करण्याबाबत अधीक्षकांनी सक्त सुचना दिल्या गेल्या नसल्याचे दिसून येते. 58

3) यापुढे सदर बाटल्यांचा नाश अनुज्ञप्तीधारकाने संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत करणे आवश्यक राहील.

4) परिपत्रकातील निर्देशानुसार विदेशी मद्याच्या बाटल्या नाश करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करून त्याबाबतचे पुरावे (Photo) किंवा (Video) अनुज्ञप्तीधारकांनी संबंधित विभागीय अधिकारी यांना देणे आवश्यक आहे. याबाबत अनुज्ञप्तीधारकांना निर्देश देण्यात यावेत व सर्व सुचनांचे काटेकोरपणे पालन होईल, याबाबत अधीक्षकांनी सर्वतोपरी दक्षता घ्यावी. नियंत्रण ठेवावे.

सदर परिपत्रकाची अंमलबजावणी अनुज्ञप्तीधारक व सर्व कार्यकारी निरीक्षक व दुय्यम निरीक्षक यांच्याकडून होत नसल्याने सदर बाब गंभीर आहे. सदर परिपत्रकामधील सुचनांचा अधीक्षकांनी आढावा घेण्यात यावा, असे निर्देशित केले होते. परंतु तसा आढावा अधीक्षकांनी वेळोवेळी घेतलेला दिसून येत नाही.

सर्व कार्यकारी अधिकारी अनुज्ञप्ती निरीक्षणावेळी प्रत्येक अनुज्ञप्तीधारक वरील निर्देशांचे नियमीतपणे पालन करीत आहे याची खात्री करतील व त्याबाबत भेट पुस्तिकेत तसे अभिप्राय नोंदवतील. जे अनुज्ञप्तीधारक वरील निर्देशांचे पालन करणार नाहीत त्यांच्या ~~विरुद्ध~~ विभागीय नियमभंगाची कारवाई करण्यात यावी. तसेच परदेशी IMFL बाटल्यांचा पुनर्वापर होणार नाही याबाबत योग्य ती दक्षता घेऊन जिल्हा स्तरावर होणाऱ्या मासिक बैठकीत अधीक्षकांनी याबाबत केलेल्या कार्यवाहीचा आढावा सादर करण्याबाबत दक्षता घ्यावी.

**वरीलप्रमाणे सुचनांचे उल्लंघन करणाऱ्या अनुज्ञप्ती धारकांवर मुंबई दारूबंदी कायदा 1948 कलम 54/56 अन्वये अनुज्ञप्ती निलंबित किंवा रद्द करण्याची कारवाई करावी.** सदर कारवाईचा आढावा आयुक्त व संचालक हे अधीक्षकांच्या आढावा बैठकीत घेतील.

सदर परिपत्रकाची अंमलबजावणी तात्काळ व काटेकोरपणे सुरू करावी. जेणेकरून बाटल्यांचा पुनर्वापर होणार नाही व त्यामुळे अधिकृत मद्य विक्रीत वाढ होऊन शासनाच्या महसुलात वाढ होईल.

( विजय सिंघल )
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

क्रमांक-डिईटी -112016/113/सआ/ 54 — नाशिक,दिनांक 30 जानेवारी 2016

अधीक्षक,राज्य उत्पादन शुल्क,नाशिक/जळगांव/धुळे/नंदुरबार यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाही साठी रवाना.

निर्गमीत केले
जावक क्रमांक ....54....
दिनांक ....30/1/2016....
स्वाक्षरी ........

30/1/2016
(प्रसाद प्र.सुर्वे)
विभागीय उप आयुक्त,
राज्य उत्पादन शुल्क,नाशिक विभाग नाशिक

B.R.P.